SAMPLE CONTENT

# SMART NOTES

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

## इयत्ता बारावी

# चिटणिसाची कार्यपद्धती

सर्व सूचीबद्ध कंपन्यांसाठी पूर्ण वेळ कंपनी चिटणीस नियुक्त करणे बंधनकारक आहे.



Published by:
LAZY BONE EDUCATION

SMART NOTES

# चिटणिसाची कार्यपद्धती

## इयत्ता बारावी

(महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यात आलेल्या अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित.)

**ठळक वैशिष्ट्ये**

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित
- प्रश्नोत्तरांच्या स्वरूपामध्ये पाठांचा परिपूर्ण आढावा
- परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची सुयोग्य मांडणी
- मुद्दे लक्षात ठेवण्यासाठी ‘झटपट उजळणी’ समाविष्ट
- ‘ज्ञानात भर’ या शीर्षकांतर्गत संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण
- संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा ‘ज्ञानगुरू’ समाविष्ट
- दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश
- उत्तरे लक्षात राहण्याकरता महत्त्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात
- फेब्रुवारी २०२० पर्यंतच्या बोर्डाच्या परीक्षांचे प्रश्न उत्तरांसहित समाविष्ट
- प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनाकरता ‘सराव चाचणी’ (उत्तरे Q. R. Code मार्फत) समाविष्ट

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2363**

P.O. No. 4696

Sample Content

## प्रस्तावना

टार्गेट प्रकाशनाचे **Smart Notes चिटणिसाची कार्यपद्धती इयत्ता बारावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांचे या विषयाचे आकलन व ज्ञान समृद्ध करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजतील व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेतच. सोबतच पाठांचा संपूर्ण आढावा घेण्याच्या दृष्टीने काही अधिकच्या प्रश्नांचाही यात समावेश करण्यात आला आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे ही सविस्तर, मुद्देसूद व परीक्षेच्या दृष्टीने आदर्श उत्तरे आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जाणे सोपे जाईल.

दीर्घ व अवघड उत्तरे सहज लक्षात राहावीत म्हणून आवश्यक तेथे 'झटपट उजळणी' देण्यात आली आहे. शक्य तेथे महत्त्वाचे शब्द ठळक करून देण्यात आले आहेत. ज्यामुळे, उत्तर लक्षात ठेवणे सोपे जाईल. कोणत्याही विषयाचे अध्ययन तेव्हाच परिपूर्ण होते, जेव्हा त्यातील सर्व संकल्पना व्यवस्थित समजून घेतल्या जातात. या दृष्टीने, संकल्पनांचे आकलन उत्तमरीतीने व्हावे याकरता आवश्यक तेथे 'ज्ञानात भर' या शीर्षकाखाली मुद्द्याचे अधिक स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच, संकल्पनांना वास्तविकतेची जोड देणारा 'ज्ञानगुरू' रंजक व व्यावहारिक माहिती देण्यासाठी तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल. स्वयंमूल्यमापनासाठी प्रत्येक पाठाच्या शेवटी 'सराव चाचणी' देण्यात आली आहे. या सराव चाचणीची उत्तरे Q. R. Codes मार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांचे विषयाचे ज्ञान सखोल व परिपूर्ण करणारी या पुस्तकाची अनोखी रचना विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्वांच्याच पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी: mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'चिटणिसाची कार्यपद्धती; प्रथमावृत्ती: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

## ‘चिटणिसाची कार्यपद्धती’ हा विषय का शिकावा?

परीक्षेत उत्तम गुण मिळवण्यासोबतच हा विषय शिकण्याचे इतरही अनेक फायदे आहेत.

१. ह्या विषयाच्या अभ्यासातून आपल्याला कंपनीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरील कंपनी चिटणिसाची भूमिका व कार्ये यांविषयी सखोल ज्ञान मिळते. Company Secretary म्हणजेच कंपनी चिटणीस होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना या विषयाद्वारे संकल्पनांचे उत्तम ज्ञान मिळू शकेल.

२. कंपनी चिटणिसाला भागधारक, ठेवीदार, कर्जरोखेधारक, बँकर्स इत्यादी विविध व्यक्तींशी पत्रव्यवहार करावा लागतो. हा पत्रव्यवहार कशाप्रकारे केला पाहिजे हे समजण्यात हा विषय साहाय्यभूत ठरतो.

३. ‘भागपेढी पद्धती’, ‘वित्तीय बाजार’ व ‘भाग बाजार’ यांसारख्या पाठांतून कंपनीच्या दृष्टिकोनातून व कंपनी चिटणिसाच्या भूमिकेविषयी सखोल व व्यावहारिक ज्ञान मिळते.

प्रोफेशनल कोर्सेस म्हणजेच व्यावसायिक अभ्यासक्रम निवडू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा विषय अधिकच महत्त्वाचा आहे.

## या पुस्तकातून अभ्यास कसा कराल?

या पुस्तकाचे दोन विभाग करण्यात आले आहेत:

**१) दीर्घोत्तरी प्रश्न** **२. वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न**

**दीर्घोत्तरी प्रश्न:**

येथे देण्यात आलेल्या प्रश्नांचा क्रम हा धड्याच्या ओघाशी मिळताजुळता आहे. त्यामुळे, एकदा तुम्ही ही सर्व प्रश्नोत्तरे वाचलीत, की तुमचा पाठ्यपुस्तकातील धडा पूर्ण वाचल्यासारखेच होईल. तेव्हा तुम्ही प्रथम ह्या विभागाचा अभ्यास करावा.

**वस्तुनिष्ठ/आकलनाधारित प्रश्न:**

हा विभाग दीर्घोत्तरी प्रश्न विभागानंतर येतो. यातील प्रश्न वस्तुनिष्ठ प्रश्न किंवा ज्ञानाच्या उपयोजनावर आधारित प्रश्न आहेत. दीर्घोत्तरी प्रश्नांचा अभ्यास केल्यानंतर ह्या विभागातील प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हांला सहजसोपे होईल. शिवाय, तुमची तयारी तपासून पाहण्याकरता उत्तरे दिली आहेतच.

Sample Content

# वैशिष्ट्ये

**झटपट उजळणी**

काही वेळा प्रश्नांची उत्तरे खूपच मोठी व थोडी अवघड असतात. अशा वेळी संपूर्ण उत्तर लक्षात ठेवणे अवघड जाते. यासाठी संपूर्ण उत्तराचा संक्षिप्त आढावा घेणारी 'झटपट उजळणी' या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना उजळणी करणे सोपे जाईल.

**ज्ञानात भर**

काही संकल्पना थोड्या अवघड किंवा गोंधळात टाकणाऱ्या असतात. त्या समजण्यासाठी थोडेसे स्पष्टीकरण पुरेसे होत नाही. म्हणूनच, 'ज्ञानात भर' या शीर्षकांतर्गत अशा संकल्पना अधिक सुस्पष्टपणे समजावून सांगितल्या आहेत. येथे दिलेली माहिती परीक्षेत लिहिण्याची आवश्यकता नाही. ही माहिती केवळ संकल्पना चांगल्या पद्धतीने समजून घेण्याकरता आहे.

**ज्ञानगुरू**

ज्ञानगुरू नावाचा एक खास मित्र तुमच्या भेटीस घेऊन येत आहोत. हा मित्र तुम्हांला पुस्तकात ठिकठिकाणी भेटेल आणि तुम्ही शिकत असलेल्या विषयासंबंधी तुम्हांला व्यावहारिक जीवनातील उदाहरणे किंवा रंजक माहिती देईल.

**सराव चाचणी**

प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनासाठी सराव चाचणी देण्यात आली आहे. सराव चाचणीची उत्तरे Q. R. Codes मार्फत देण्यात आली आहेत.

Sample content

## प्रश्नपत्रिकेचे प्रारूप

**गुण: ८०** **वेळ: ३ तास**

| प्र.क्र. | प्रश्न | प्रत्येक प्रश्नासाठी गुण | सोडवण्याच्या प्रश्नांची संख्या | विकल्पांशिवाय गुण | विकल्पांसहित गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | **खाली दिलेल्या उपप्रश्नांपैकी कोणतेही चार उपप्रश्न विचारले जातील.** | | | | |
| | अ. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ब. जोड्या जुळवा. | १ | ५ | ५ | ५ |
| | क. योग्य शब्द / शब्दसमूह / संज्ञा लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ड. बरोबर की चूक ते लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | इ. गटात न बसणारा शब्द शोधा. | १ | ५ | ५ | ५ |
| | फ. खालील विधाने पूर्ण करा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ग. कंसातील अचूक पर्याय निवडा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ह. एका वाक्यात उत्तरे लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ई. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा. | १ | ५ | ५ | ५ |
| | ज. योग्य क्रम लावा. | १ | ५ | ५ | ५ |
| २. | खालील संज्ञा/ संकल्पना स्पष्ट करा. | २ | ६ पैकी ४ | ८ | १२ |
| ३. | खालील घटना/ परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा. | ३ | ३ पैकी २ | ६ | ९ |
| ४. | फरक स्पष्ट करा. | ४ | ४ पैकी ३ | १२ | १६ |
| ५. | खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. | ४ | ३ पैकी २ | ८ | १२ |
| ६. | खालील विधाने सकारण स्पष्ट करा. | ४ | ४ पैकी २ | ८ | १६ |
| ७. | खालील प्रश्न सोडवा. (पत्रलेखन) | ५ | ३ पैकी २ | १० | १५ |
| ८. | खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न) | ८ | २ पैकी १ | ८ | १६ |
| | **एकूण गुण** | | | **८०** | **११६** |

Sample Content

### गुणांचे प्रश्नांनुसार विभाजन

| अनु. क्र. | प्रश्नप्रकार | गुण | विकल्पांसहित गुण | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | वस्तुनिष्ठ | २० | २० | २५% |
| २ | लघुत्तरी | ५२ | ८० | ६५% |
| ३ | दीर्घोत्तरी | ०८ | १६ | १०% |
| | **एकूण गुण** | **८०** | **११६** | **१००%** |

## पुस्तकात देण्यात आलेले विविध प्रश्नप्रकार

या पुस्तकात तुम्ही पुढील प्रकारांतील प्रश्नांचा अभ्यास करणार आहात.

| अनु. क्र. | प्रश्नप्रकार | पाठ १ | पाठ २ | पाठ ३ | पाठ ४ | पाठ ५ | पाठ ६ | पाठ ७ | पाठ ८ | पाठ ९ | पाठ १० | पाठ ११ | पाठ १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **दीर्घोत्तरी प्रश्न** | | | | | | | | | | | | |
| १. | **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २. | **खालील प्रश्न सोडवा. (पत्रलेखन)** | × | × | × | × | × | ✓ | ✓ | ✓ | × | × | × | × |
| ३. | **फरक स्पष्ट करा.** | ✓ | ✓ | ✓ | × | × | × | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | **वस्तुनिष्ठ प्रश्न** | | | | | | | | | | | | |
| अ. | योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ब. | योग्य जोड्या जुळवा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| क. | खालील विधानांसाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ड. | खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| इ. | गटात न बसणारा शब्द ओळखा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| फ. | खालील विधाने पूर्ण करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ग. | कंसातील अचूक पर्याय निवडा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ह. | एका वाक्यात उत्तरे लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| इ. | खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ज. | योग्य क्रम लावा. | ✓ | × | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | × | × |
| | खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील विधाने सकारण स्पष्ट करा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| | खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा. | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

**टीप:** वरील सर्व प्रश्नप्रकार पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहेत.

Sample Content

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | पाठाचे नाव | एकूण गुण | विकल्पांसहित गुण | पृष्ठ क्र. (दीर्घोत्तरी प्रश्न) | पृष्ठ क्र. (वस्तुनिष्ठ प्रश्न) |
|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थात्मक वित्त व्यवस्थापनाची ओळख | १७ | २५ | १ | १३३ |
| २. | संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे स्रोत | | | १२ | १४४ |
| ३. | भाग विक्री | २४ | ३५ | ३० | १५७ |
| ४. | कर्जरोखे विक्री | | | ४९ | १७६ |
| ५. | ठेवी | | | ५७ | १८८ |
| ६. | सभासदांशी पत्रव्यवहार | १३ | १८ | ६७ | २०३ |
| ७. | कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार | | | ७५ | २१० |
| ८. | ठेवीदारांशी पत्रव्यवहार | | | ८६ | २१९ |
| ९. | भागपेढी पद्धती | ०७ | ११ | ९४ | २२६ |
| १०. | लाभांश आणि व्याज | ०९ | १३ | १०५ | २३८ |
| ११. | वित्तीय बाजार | १० | १४ | ११४ | २५३ |
| १२. | भाग बाजार | | | १२३ | २६२ |
| | **एकूण गुण** | ८० | ११६ | | |


**टीप:** i. पाठाखाली दिलेले प्रश्न **(T)** चा चिन्हाने दर्शवले आहेत.

ii. प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला अनुक्रमणिका देण्यात आली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना पाठाचा आढावा घेता येईल. बोर्डाच्या परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांपुढे शक्य तेथे त्या परीक्षेचे वर्ष नमूद करण्यात आले आहे.

Sample Content

Sample Content

# १ संस्थात्मक वित्त व्यवस्थापनाची ओळख

| अनु.क्र. | तपशील | बोर्ड परीक्षा |
|---|---|---|
| १. | संस्थात्मक वित्त व्यवस्था म्हणजे काय?<br>संस्थात्मक वित्त व्यवस्थेच्या नीतीचे आधार असणारे दोन निर्णय नमूद करा. **(T)** | |
| २. | संस्थात्मक वित्त व्यवस्थेमध्ये कोणत्या विविध गोष्टींचा अंतर्भाव असतो? वित्त व्यवस्थापकाला कोणते निर्णय घ्यावे लागतात? | |
| ३. | संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व विशद करा. **(T)** | |
| ४. | व्यवसाय सुरू करण्यापूर्वी उद्योजकाला कोणती पावले उचलावी लागतात? | |
| ५. | स्थिर भांडवल ही संकल्पना स्पष्ट करा. | |
| ६. | स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे चार घटक लिहा. **(T)** | फेब्रुवारी १८ |
| ७. | खेळते भांडवल (कार्यकारी भांडवल) ही संकल्पना स्पष्ट करा. | |
| ८. | खेळते भांडवल निश्चित करणाऱ्या घटकांवर चर्चा करा. **(T)** | |
| ९. | भांडवल संरचनेचा अर्थ स्पष्ट करा व त्याचे घटक सांगा. **(T)** | फेब्रुवारी २०, मार्च १६, ऑक्टोबर १५ |
| १०. | फरक स्पष्ट करा. | |
| ११. | सराव चाचणी | |

**प्रस्तावना**

कोणत्याही उद्योग संस्थेसाठी वित्त ही अत्यावश्यक गोष्ट आहे. वित्त म्हणजे पैसे व पैशाचे व्यवस्थापन होय. कोणत्याही व्यावसायिक संस्थेचे यश हे निधीची उभारणी कशी करावी, निधी कोठून उभा करावा व त्याचा विनियोग कसा करावा या बाबींच्या ज्ञानावर अवलंबून असते. संस्थात्मक वित्तव्यवस्था भांडवल संपादन व त्याचा योग्य विनियोग याकडे लक्ष देते. संस्थात्मक वित्त व्यवस्था दोन महत्त्वाचे घटक आहेत – वित्तीय निश्चितीचा निर्णय आणि वित्त निर्णय. वित्तीय निश्चितीचे निर्णय हे भांडवल संरचनेशी, तर गुंतवणूक निर्णय हे भांडवली अर्थसंकल्पाशी संबंधित असतात. एखादया उद्योगाला यशस्वी वित्तीय योजनेसाठी भांडवली गरजांचा अंदाज घ्यावा लागतो. त्याला 'स्थिर भांडवल' व 'खेळते भांडवल' यांची आवश्यकता विचारात घ्यावी लागते. या पाठात संस्थात्मक वित्त व्यवस्थेशी संबंधित मूलभूत संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

## प्र. १ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**१. संस्थात्मक वित्त व्यवस्था म्हणजे काय? संस्थात्मक वित्त व्यवस्थेच्या नीतीचे आधार असणारे दोन निर्णय नमूद करा.** (T)

उत्तर: **संस्थात्मक वित्त व्यवस्था ही संस्थेसाठी निधी उपलब्धता व त्याचा योग्य विनियोग याच्याशी संबंधित असते.** यामध्ये संस्थेच्या कार्यांना वित्त पुरवठा करणे, भांडवल संरचना, गुंतवणूक निर्णय यांचा समावेश होतो. हेन्री हॉगलँड यांच्या मते, "संस्थात्मक वित्त व्यवस्था व्यावसायिक संस्थेने केलेले भांडवल संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते."

खालील निर्णय हे संस्थात्मक वित्त व्यवस्थेच्या नीतीचे आधार आहेत:

१) वित्तीय निश्चितीचा निर्णय

i. **वित्तीय निश्चितीचा निर्णय भांडवलाचा स्रोत ठरवण्याशी संबंधित असतो.** व्यावसायिक संस्थेसमोर वित्त उभारणीचे विविध पर्याय उपलब्ध असतात.

ii. व्यावसायिक संस्थेला वित्तीय गरज भागवण्यासाठी भांडवल बाजारात प्रवेश करता येतो.

iii. संस्था समहक्क भाग भांडवल किंवा कर्जाऊ भांडवल यांमधील योग्य पर्यायाची निवड करू शकते.

iv. बँकेतून कर्ज किंवा सार्वजनिक ठेवी किंवा कर्जरोख्यांचा पर्याय संस्थेकडे असतो.

v. वित्तीय व्यवस्थापक योग्य भांडवल उभारणीची म्हणजे भांडवलाची योग्य रक्कम तसेच योग्य प्रमाणातील कर्जाऊ रक्कम व समहक्क भाग भांडवल यांचे मिश्रण यांची खात्री देतो.

Sample Content


**२) <u>वित्त गुंतवणुकीचा निर्णय</u>**

i. व्यावसायिक संस्थेला जेव्हा भांडवल प्राप्त करण्याचे विविध पर्याय उपलब्ध होतात तेव्हा वित्तीय व्यवस्थापकाला निधीचा योग्य रीतीने उपयोग करण्याबाबत निर्णय घ्यावे लागतात, जेणेकरून भागधारकांना कमाल लाभांश मिळवून देता येईल.

ii. याकरता संस्थेला 'भांडवलाचे मूल्य' विचारात घ्यावे लागते.

iii. एकदा भांडवलाचे मूल्य कळले, की मग भांडवलावरील परतावा हा भांडवली मूल्यापेक्षा जास्त असेल, अशा पद्धतीने संस्था निधींचे नियोजन करू शकते.

iv. गुंतवणूक करण्यासाठी निधी मिळवणे व व्यवसायामध्ये त्याचा यशस्वीरित्या उपयोग करणे यालाच 'गुंतवणुकीचा निर्णय' असे म्हणतात. यालाच 'भांडवली अर्थसंकल्प' असेही म्हटले जाते.



**ज्ञानगुरू**

भांडवली अर्थसंकल्प हा कोणत्याही व्यवसायाचा एक महत्त्वाचा पैलू असतो. व्यवसायाने असे प्रकल्प ओळखले पाहिजेत जे पैशांच्या गुंतवणुकीसाठी उपयुक्त असतात. जर व्यवसायाची भांडवली गुंतवणूक चुकीची असेल, तर त्याची परिणिती अकार्यक्षम व्यवसायात होऊ शकते. गरजेपेक्षा अधिक गुंतवणूक किंवा कमी गुंतवणूक दोन्हींमुळे व्यवसायाचे नुकसान होऊ शकते.

**झटपट उजळणी**

| वित्तीय निश्चितीचा निर्णय | वित्त गुंतवणुकीचा निर्णय |
|---|---|
| १) भांडवल संरचनेशी संबंधित. | १) भांडवली गुंतवणुकीशी संबंधित. |
| २) भांडवलाच्या स्रोतांच्या पर्यायांशी संबंधित निर्णय. | २) निधीच्या योग्य उपयोगाशी संबंधित निर्णय. |
| ३) समहक्क भाग भांडवल व कर्जाऊ भाग भांडवल यांत पर्याय. | ३) भांडवलाचे महत्त्वाचे मूल्य समजून घेणे. |
| ४) भांडवलाचे स्रोत:<br>**स्वत:चे भांडवल:** भाग भांडवल, राखीव व अतिरिक्त निधी<br>**कर्ज घेतलेले भांडवल:** कर्जरोखे, बँकेचे कर्ज, वित्तीय संस्थांचे मुदत कर्ज. | ४) गुंतवणुकीचा परतावा हा भांडवलाच्या मूल्यापेक्षा अधिक असला पाहिजे. |

**२. संस्थात्मक वित्त व्यवस्थेमध्ये कोणत्या विविध गोष्टींचा अंतर्भाव असतो? वित्त व्यवस्थापकाला कोणते निर्णय घ्यावे लागतात?**

**उत्तर:** संस्थात्मक वित्त व्यवस्था ही संस्थेसाठी निधी उपलब्धता व त्याचा योग्य विनियोग याच्याशी संबंधित असते. कोणत्याही व्यवसायाचे यश हे निधी उभारणीची क्षमता व निधीचा विनियोग करण्याची कार्यक्षमता यांवर अवलंबून असते.
वित्तीय संस्था व बँकांना यात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**१) <u>संस्थात्मक वित्त व्यवस्थेमध्ये अंतर्भूत घटक</u>**

i. वित्तीय नियोजन

ii. भांडवली बाजारपेठ, मुद्राबाजार, भागभांडवल बाजार यांचा अभ्यास.

iii. भांडवल निर्मिती व विदेशी भांडवल.

**२) <u>वित्त व्यवस्थापकाची कार्ये</u>**

कोणत्याही संस्थेच्या वित्त व्यवस्थापकाला खालील गोष्टींची खात्री द्यावी लागते.

i. संस्थेकडे पुरेशी व समाधानकारक वित्त व्यवस्था उपलब्ध आहे.

ii. संस्था, किमान मूल्य असलेल्या योग्य प्रकारच्या निधीचा वापर करत आहे.

iii. संस्था उभ्या केलेल्या निधीचा योग्य वापर करत आहे.

iv. संस्थेच्या मालकांसाठी कमाल लाभांश निर्मितीसाठी प्रयत्न करत आहे.

Sample Content

**३. संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व विशद करा.** (T)

**उत्तर:** कोणत्याही व्यावसायिक संस्थेच्या कार्यात्मक व्यवस्थापनात उत्पादन, वित्त, विपणन तसेच कर्मचाऱ्यांच्या कृती याला खूप महत्त्व असते. या सर्वांमध्ये वित्तीय कामकाजाला सगळ्यांत जास्त महत्त्व दिले आहे. संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व खालीलप्रमाणे:

**१) निर्णत प्रक्रियेत मदत करते**

i. व्यावसायिक संस्थांचे बहुतेक सर्व निर्णय हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असतात.
ii. व्यवसायातील कोणतेही कार्य निधीशिवाय स्वतंत्रपणे पार पाडणे अशक्य असते.
iii. व्यवसायामधील प्रत्येक निर्णय घेताना त्याचा नफ्यावरील परिणाम लक्षात घेणे आवश्यक असते.
iv. समोर असणाऱ्या निरनिराळ्या पर्यायांतून कमाल नफा मिळवून देईल अशाच पर्यायाचा व्यवस्थापन स्वीकार करते.
v. आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असणारे प्रकल्पच व्यावसायिक संस्था हातात घेते.
vi. अशाप्रकारे, संस्थात्मक वित्त व्यवस्था निर्णय प्रक्रियेमध्ये मोलाची भूमिका बजावते.

**ज्ञानात भर**

**आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य:** जेव्हा एखादया प्रकल्प / कल्पना / व्यवसायातून त्याचे खर्च भागवण्यास पुरेसे असेल इतके उत्पन्न मिळते, तेव्हा त्याला आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य प्रकल्प / व्यवसाय म्हणतात.

**२) प्रकल्पासाठी भांडवल उभारणी करणे**

नवीन उपक्रमासाठी व्यावसायिक संस्थेला भांडवल उभारणी करणे आवश्यक असते. भांडवल उभारणीसाठी व्यावसायिक संस्थेकडे समभाग, कर्जरोखे, बंधपत्रे यांची विक्री करणे किंवा बँकेचे कर्ज घेणे असे विविध पर्याय उपलब्ध असतात.

**३) संशोधन व विकास कार्यात मदत करते.**

i. संशोधन, विकास व तपशीलवार शोधकार्य हे व्यवसायाच्या वाढीसाठी व विस्तारासाठी अतिशय महत्त्वाचे असते.
ii. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्याची तांत्रिक बाजू सविस्तरपणे समजून घेणे आवश्यक असते.
iii. संशोधनाच्या या मोठ्या कालावधीत सातत्याने निधी उपलब्ध करून दयावा लागतो. यामध्ये अविरत आर्थिक आधार आवश्यक असतो.
iv. तसेच जुन्या उत्पादित वस्तूंची श्रेणी सुधारून किंवा नवीन वस्तूंचे उत्पादन विकसित करून ग्राहकांना आकर्षित करावे लागते.
v. यासाठी कंपनीला बाजार सर्वेक्षण तसेच बाजाराचे विश्लेषण करावे लागते. यामध्ये पुन्हा आर्थिक आधाराची गरज असते.

**४) व्यवसाय सुरळीत चालण्यास मदत करते.**

निधीचा ओघ सुरळीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देणे, कर्जाऊ रकमेची परतफेड वेळेत करणे, कच्च्या मालाची जेव्हा गरज भासते तेव्हा तो विकत घेता येणे तसेच उत्पादित वस्तूंचे विक्री संवर्धन व नवीन वस्तूंचे उत्पादन बाजारात सहजपणे आणणे या सर्व गोष्टी शक्य होतात.

**५) विविध व्यावसायिक कार्यांमध्ये समन्वय साधते.**

संस्थात्मक वित्त व्यवस्था संस्थेतील विविध कार्यांवर नियंत्रण तसेच समन्वय ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. **उदा.** जर वित्त विभागाने कच्च्या मालाच्या खरेदीसाठी आवश्यक निधींचा पुरवठा केला नाही आणि दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक गरजांची पूर्तता केली नाही, तर 'उत्पादन विभागाचे' काम चालवणे खूप कठीण होईल. यामुळे उत्पादन क्षमतेला झळ पोहोचेल व याचा विक्री, कंपनीचे उत्पन्न, गुंतवणुकीचा दर यांवर दुष्परिणाम होईल. अशाप्रकारे, प्रत्येक विभागाची कार्यक्षमता प्रभावी आर्थिक व्यवस्थापनावर अवलंबून असते.

**६) विस्तार व विविधीकरणाला प्रोत्साहन देते.**

i. विस्तारीकरण व विविधीकरणासाठी आधुनिक यंत्रसामग्री व आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता असते.
ii. आधुनिक यंत्रसामग्री तसेच आधुनिक तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी संस्थात्मक वित्त व्यवस्था पैसे उपलब्ध करते.
iii. म्हणूनच कंपनीच्या विस्तारीकरणासाठी तसेच विविधीकरणासाठी वित्त अनिवार्य असते.

**७) व्यवस्थापकीय जोखीम हाताळणे**

अचानक विक्रीत झालेली घट, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला तोटा, संपामुळे झालेला तोटा अशा प्रकारच्या अनेक व्यावसायिक जोखिमा हाताळण्यासाठी कंपनीला आर्थिक व्यवस्थापनाची गरज असते.

**८) जुन्या मालमत्ता बदलणे**

यंत्रसंच व यंत्रसामग्री काळानुरूप जुनी होऊन कालबाह्य होतात. अशावेळी ती बदलावी लागते. नवीन यंत्रसामग्री घेण्यासाठी निधीची आवश्यकता असते.

Sample Content

९) **लाभांश आणि व्याज देण्यासाठी मदत करते.**
भागधारकांना लाभांश तसेच कर्जरोखेधारक व बँकांना व्याज देण्यासाठी वित्त व्यवस्था आवश्यक असते.

१०) **विविध कर व शुल्क भरण्यासाठी मदत करते.**
कंपनी सरकारला आयकर, वस्तू व सेवा कर तसेच नोंदणी अधिकाऱ्याला अदा करावयाचे शुल्क इत्यादी प्रकारचे कर आणि आकार विविध वेळी भरत असते. अशा कर व आकार भरणीसाठी संस्थात्मक वित्त व्यवस्था मदत करते.

### ४. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी उद्योजकाला कोणती पावले उचलावी लागतात?

**उत्तर:** जेव्हा उद्योजक एखाद्या व्यावसायिक प्रकल्पाची कल्पना करतो, तेव्हा तो त्या कल्पनेच्या व्यावसायिक शक्यता व प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा शोध घेतो. एकदा प्रकल्पाच्या व्यवहार्यतेविषयी समाधानकारक उत्तर मिळाले, की तो प्रकल्प उभारणीसाठी पावले उचलतो.

**ज्ञानात भर**

**व्यावसायिक शक्यता:** व्यावसायिक शक्यता ही प्रकल्पाची उद्दिष्टे लक्षात घेणे, संधी आणि अडचणी ओळखणे, तसेच उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांचे विश्लेषण करणे याची प्रक्रिया आहे. व्यवसाय कल्पना विकसित करणे फायदेशीर आहे, की नाही हे ठरवण्यात याची मदत होते.

उद्योजकाने उचललेली महत्त्वाची पावले पुढीलप्रमाणे:

१) **भांडवलाची गरज ठरवणे**
एकदा उद्योजकाने प्रकल्प सुरू करायचे ठरवले, की त्याचे पहिले व खूप महत्त्वाचे पाऊल म्हणजे व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि चालवण्यासाठी किती व कोणत्या स्वरूपातील भांडवल आवश्यक आहे याचा निर्णय घेणे. हा निर्णय अत्यंत काळजीपूर्वक घेणे आवश्यक असते.

२) **आर्थिक नियोजनाचा मसुदा तयार करणे**
उद्योजकाला आर्थिक नियोजनाचा मसुदा अत्यंत काळजीपूर्वक तयार करावा लागतो. आर्थिक नियोजन म्हणजे भांडवलाची आवश्यकता लक्षात घेणे व भांडवलाचे स्रोत उभे करणे. हे सद्यस्थिती तसेच भविष्यातील परिस्थितीचा विचार करून ठरवले जाते. आर्थिक नियोजनाचा मसुदा तयार करताना उद्योजकाला 'स्थिर भांडवल' व 'खेळते भांडवल' यांची आवश्यकता विचारात घ्यावी लागते.

### ५. स्थिर भांडवल ही संकल्पना स्पष्ट करा.

**उत्तर:** आर्थिक नियोजनाचा मसुदा तयार करताना उद्योजकाला 'स्थिर भांडवल' (Fixed Capital) आणि 'खेळते भांडवल' (Working Capital) यांची आवश्यकता विचारात घ्यावी लागते.

१) **स्थिर भांडवलाचा अर्थ**
**दीर्घ कालावधीसाठी वापरली जाणारी तसेच विक्रीच्या उद्देशाने न घेतलेली मालमत्ता खरेदी करण्यासाठी जे भांडवल लागते त्याला 'स्थिर भांडवल' असे म्हणतात.** सोप्या शब्दांत, स्थिर भांडवल म्हणजे कोणत्याही प्रकारची 'भौतिक मालमत्ता' म्हणजेच स्थिर मालमत्ता होय. ही संपत्ती व्यवसायामध्ये जवळजवळ कायमस्वरूपी राहते आणि त्याची पुर्नविक्री होत नाही.

२) **स्थिर भांडवलाचे स्वरूप**
स्थिर भांडवल व्यवसायात **दीर्घ कालावधीसाठी जवळजवळ कायमस्वरूपी राहते.** जमीन व इमारत, यंत्रसंच व यंत्रे,उपस्कर व अन्वायुक्ती यांच्या खरेदीकरता लागणारे भांडवल हे स्थिर भांडवलाचे उदाहरण आहे.

३) **आवश्यकतेचा काळ**
नवीन कंपनीच्या स्थापनेच्या वेळी स्थिर भांडवलाची आवश्यकता असते; परंतु विद्यमान कंपन्यांनादेखील विस्तार व विकास कार्यक्रमांना वित्त पुरवठा करण्यासाठी तसेच साधन सामग्री बदलण्यासाठी अशा भांडवलाची गरज असते.

४) **स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेचा अंदाज लावण्याच्या पायऱ्या**
कंपनी प्रवर्तक स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेची प्रारंभिक योजना तयार करतात. प्रथम त्यांना कंपनीला आवश्यक असलेल्या स्थिर मालमत्तेची यादी तयार करावी लागते व त्यांच्या किमतीचा अंदाज घेतला जातो. जमिनीच्या किमती, इमारत बांधणीचे मूल्य, यंत्रसामग्रींच्या किमती यासंबंधित माहिती ते गोळा करतात. वेगवेगळ्या स्थिर मालमत्तेच्या किमतीची बेरीज केल्यावर परिणाम स्वरूपी एकूण स्थिर भांडवलाची आवश्यकता लक्षात येते.



Sample content

५) **अंदाजाचे महत्त्व**

स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेच्या अंदाजाला अलीकडच्या वर्षांत विशेष महत्त्व दिले गेले आहे. आधुनिक औद्योगिक प्रक्रियेमुळे भांडवली साधनसामग्रीचा वाढता वापर यास कारणीभूत आहे.

६) **स्थिर भांडवलाच्या निधीचे स्त्रोत**

उद्योजक भांडवली बाजारातून स्थिर मालमत्ता खरेदीसाठी निधी मिळवतो. **भाग, कर्जरोखे, बंधपत्रे यांची विक्री किंवा दीर्घ मुदतीचे कर्ज** यांतून हा निधी उभा राहू शकतो.

**६. स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे चार घटक लिहा. (फेब्रुवारी १८) T**

**उत्तर:** उद्योगाच्या स्थिर मालमत्तेच्या खरेदीसाठी घेतलेले भांडवल म्हणजे स्थिर भांडवल होय. ही स्थिर मालमत्ता दीर्घ कालावधीसाठी वापरली जाते. तसेच तिची पुनर्विक्री करण्याचा उद्‌देश नसतो. स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे विविध घटक पुढीलप्रमाणे:

१) **व्यवसायाचे स्वरूप**

व्यवसायाचे स्वरूप स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करते. उत्पादन उद्योग व लोकोपयोगी सेवा यांना स्थिर मालमत्ता मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी गुंतवावा लागतो; मात्र खरेदी-विक्री व्यवसायात (Trading Business) मोठ्या प्रमाणात स्थिर भांडवलाची गरज नसते.

२) **व्यवसायाचे आकारमान**

जेव्हा मोठ्या प्रमाणावर ‘व्यापार’ करण्यासाठी एखाद्या व्यवसायाची स्थापना केली जाते, तेव्हा त्याला साहजिकच जास्त स्थिर भांडवलाची गरज असते. कारण या व्यवसायाच्या बहुतेक सर्वच प्रक्रिया स्वयंचलित यंत्रे व उपकरणे यांवर आधारित असतात.

३) **व्यवसायाची व्याप्ती**

जेव्हा एखादी व्यावसायिक संस्था उत्पादन व वितरण अशा संपूर्ण कार्यासाठी स्थापन केली जाते तेव्हा अधिक प्रमाणात स्थिर भांडवलाची आवश्यकता असते.

४) **भाडेतत्त्वाचे प्रमाण (Lease Basis)**

जर उद्योजकाने भाडेपट्टीच्या तत्त्वावर मालमत्ता संपादन करण्याचा निर्णय घेतला, तर त्या व्यवसायात स्थिर मालमत्तेसाठी निधीची गरज कमी भासते.

५) **उपकराराची व्यवस्था (Sub Contract)**

जर उद्योजकाने उत्पादनाच्या काही प्रक्रिया उपकरार करून इतरांकडे सुपूर्द करण्याचे ठरवले, तर उत्पादन पार पाडण्यासाठी त्याला किमान मालमत्तेची गरज असते. त्यामुळे, अशा व्यवसायांमध्ये स्थिर भांडवलाची गरज कमी भासते.

**ज्ञानात भर**

**उपकरार:** याचा अर्थ कंपनी आपल्या कामाच्या विशिष्ट भागासाठी बाहेरील व्यक्तींबरोबर करार करते. उदा. उत्पादन संस्था आपले हिशेब सांभाळण्यासाठी बाहेरील संस्थेबरोबर उपकरार करू शकतात.

६) **जुन्या मालमत्तेचे संपादन**

जुने यंत्रसंच किंवा जुनी साधनसामग्री कमी किमतीत उपलब्ध असेल, तर स्थिर मालमत्तेत आवश्यक गुंतवणूक किमान पातळीवर केली जाते.

७) **सवलतीच्या दरात मालमत्ता संपादन**

काही वेळा प्रादेशिक पातळीवर औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी सरकार सवलतीच्या दरात जमीन व बांधकाम साहित्य देते. यंत्रसंच व साधनसामग्री हप्त्याच्या आधारांवर उपलब्ध करून दिली जातात. अशा सुविधांमुळे स्थिर मालमत्तेची गरज कमी होते.

८) **आंतरराष्ट्रीय स्थिती**

आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवसाय करणाऱ्या मोठ्या संस्थांसाठी आंतरराष्ट्रीय स्थिती हा घटक खूप महत्त्वाची भूमिका बजावतो. उदा. युद्धांची शक्यता असेल व त्यामुळे पुढे सामग्रीची कमतरता भासण्याची शक्यता निर्माण होणार असेल, तर कंपनी स्थिर मालमत्तेच्या विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात निधी गुंतवण्याचा निर्णय घेते.

Sample Content

९) **अर्थव्यवस्थेचा कल**

जर कंपनीचा फायदा होणार असेल आणि भविष्यकाळ उज्ज्वल असण्याची अपेक्षा असेल, तर सर्व प्रकारच्या व्यावसायिक विस्तारासाठी मान्यता मिळते. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात निधी स्थिर मालमत्तेमध्ये गुंतवला जातो. त्यामुळे भविष्यात त्याचा फायदा मिळायला मदत होते.

१०) **लोकसंख्येचा कल**

लोकसंख्या उच्च दराने वाढली असता मागणीमध्ये वाढ होते व काही उत्पादकांना व्यवसायवाढीसाठी ही चांगली संधी आहे असे वाटते. उदा. ऑटोमोबाइल उद्योग, इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन, तयार कपड्यांचा व्यवसाय इत्यादी. यामुळे, अशा उद्योगांना मोठ्या प्रमाणावर स्थिर भांडवलाची गरज भासते.

११) **ग्राहक प्राधान्य**

भरपूर मागणी असणाऱ्या वस्तू व सेवा प्रदान करणाऱ्या उद्योग व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर स्थिर भांडवलाची आवश्यकता असते. उदा. मोबाइल फोन उत्पादक तसेच मोबाइल नेटवर्क प्रदाते.**१२) स्पर्धात्मक घटक**

स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेच्या निर्णय प्रक्रियेतील स्पर्धा हा सर्वांत मुख्य घटक आहे. जर प्रतिस्पर्धी व्यावसायिकांपैकी एखाद्या व्यावसायिकाने स्वयंचलित यंत्रणा राबवण्यास सुरुवात केली, तर त्याच प्रकारच्या व्यवसायात कार्यरत असणारे इतर व्यावसायिक त्याचे अनुकरण करण्यास उदयुक्त होतात.

### ७. खेळते भांडवल (कार्यकारी भांडवल) ही संकल्पना स्पष्ट करा.

**उत्तर:** आर्थिक नियोजनाचा मसुदा तयार करताना उद्योजकाला स्थिर भांडवल व खेळते भांडवल यांची आवश्यकता विचारात घ्यावी लागते.

१) **खेळत्या भांडवलाचा अर्थ**

**दैनंदिन व्यावसायिक कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे भांडवल** म्हणजे खेळते भांडवल होय. स्थिर भांडवलाची आवश्यकता लक्षात घेतल्यानंतर प्रवर्तकांना व्यवसायाचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक अशा निधीचा अंदाज घ्यावा लागतो.

२) **खेळत्या भांडवलाखालील घटक**

पुढील घटकांसाठी आवश्यक भांडवल हे खेळते भांडवल समजले जाते.

i. कच्चा माल व उत्पादित वस्तूंचा साठा करण्यासाठी
ii. उधार मालाच्या येणाऱ्या मूल्यांच्या वित्त पुरवठ्यासाठी
iii. दैनंदिन खर्च भागवण्यासाठी

३) **खेळत्या भांडवलाची आवश्यकता**

खालील कारणांसाठी खेळते भांडवल आवश्यक असते.

i. कच्च्या मालाचा साठा करण्यासाठी आणि तयार उत्पादित वस्तूंचा पुरेसा साठा राखण्यासाठी संस्थेला निधीची गरज असते.
ii. माल रोखीने किंवा उधारीने विकला जातो. उधारीने विकलेल्या वस्तूंची रोख रक्कम लगेच परत येत नाही. उधार मालाचे मूल्य जमा होईपर्यंतच्या काळात संस्थेला निधीची व्यवस्था करावी लागते.
iii. कारखान्याचे खर्च भागवण्यासाठी निधीची आवश्यकता असते.
iv. अनिश्चितता हे व्यवसायाचे वैशिष्ट्य असल्याने अनपेक्षित प्रतिकूलतेसाठी रोख रक्कम राखून ठेवणे आवश्यक असते.

४) **निव्वळ खेळते भांडवल**

खेळत्या भांडवलाच्या संकल्पना महत्त्वाच्या अधिकारी व्यक्तींनी भिन्नपणे मांडल्या आहेत. काहींच्या मते, चालू संपत्तीचे चालू दायित्वावर जेवढे आधिक्य असते ती अतिरिक्त रक्कम म्हणजेच खेळते भांडवल! जेस्टनबर्ग यांच्या मते, “खेळते भांडवल म्हणजे चालू संपत्तीचे चालू दायित्वावरील अधिक्य.” याच दृष्टिकोनातून याला **निव्वळ खेळते भांडवल** असे म्हणतात. जेस्टनबर्ग याला खेळते भांडवल म्हणत नाहीत. ते याला ‘अभिसरण भांडवल’ असे म्हणतात.

५) **एकूण खेळते भांडवल**

काही तज्ज्ञांनी अधिक व्यापक दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यांच्या मते, **चालू संपत्तीच्या समतुल्य असते ते खेळते भांडवल** होय. जे. एस. मिलच्या मते, “एकूण चालू मालमत्ता म्हणजेच व्यवसायातील खेळते भांडवल.” कंपनीच्या सर्व चालू संपत्तीचा यामध्ये समावेश केला जातो. यालाच **एकूण खेळते भांडवल** असे म्हणतात.

Sample Content

**८. खेळते भांडवल निश्चित करणाऱ्या घटकांवर चर्चा करा.** (T)

**उत्तर:** खेळत्या भांडवलाची आवश्यकता मोजण्यासाठी कोणतीही अचूक मानके नाहीत. व्यवसाय ज्या अर्थिक वातावरणात कार्यरत असेल त्याचा तसेच इतर अनेक गोष्टींवर विचार करून व्यवस्थापकांना खेळत्या भांडवलाचे प्रमाण निश्चित करावे लागते. खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) **व्यवसायाचे स्वरूप**

व्यवसायाच्या स्वरूपावर खेळत्या भांडवलाची आवश्यकता अवलंबून असते.

i. दैनंदिन वापराच्या आवश्यक वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या व्यवसायिक संस्थांना तुलनेने कमी खेळत्या भांडवलाची गरज भासते कारण दायित्वाची काळजी घेण्यासाठी संस्थेत सतत व पुरेसा रोख रकमेचा ओघ सुरू असतो.

ii. सार्वजनिक उपक्रमांमध्येसुद्धा ग्राहकाकडून रोख रकमेचा ओघ सतत सुरू असल्यामुळे खेळत्या भांडवलाची गरज खूप कमी असते.

iii. चैनीच्या वस्तूंचा व्यापार करणाऱ्या संस्थेला मोठ्या प्रमाणावर खेळत्या भांडवलाची आवश्यकता भासते कारण या वस्तूंच्या विक्रीमध्ये सातत्य नसते.

iv. वस्तूंच्या वितरणाशी संबंधित संस्थांना ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी भरपूर प्रमाणात मालसाठा (inventory) तयार ठेवावा लागतो. याशिवाय ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी पत सुविधा (credit facility) पुरवावी लागते. परिणामी, अशा संस्थांना मोठ्या प्रमाणावर खेळत्या भांडवलाची गरज असते.

२) **व्यवसायाचे आकारमान**

व्यवसायाच्या आकारमानाचा खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम होतो. मोठ्या प्रमाणावर व्यापार करणाऱ्या कंपनीस खेळत्या भांडवलाची अधिक गरज असते.

३) **विक्रीचे प्रमाण**

विक्रीचे प्रमाण हा खेळत्या भांडवलाच्या आकारमानावर परिणाम करणारा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. एकूण विक्रीचे प्रमाण व खेळते भांडवल यांचे एकमेकांशी थेट नाते आहे. जर विक्रीचे प्रमाण वाढते असेल, तर त्याच प्रमाणात खेळते भांडवलही उपलब्ध करून द्यावे लागते.

४) **उत्पादन चक्र**

कच्च्या मालाचे तयार वस्तूमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे उत्पादन चक्र होय. जर उत्पादन चक्राला लागणारा कालावधी मोठा असेल, तर खेळते भांडवल जास्त प्रमाणात लागते. जर उत्पादन चक्राचा कालावधी कमी असेल, तर खेळते भांडवल कमी प्रमाणात लागते.

५) **व्यापारी चक्र**

जेव्हा बाजारात तेजी असते तेव्हा विक्रीच्या एकूण प्रमाणात वाढ होते, परिणामी वस्तूंचा साठा वाढवणे आवश्यक असते. त्यामुळे, व्यवसायांना अधिक खेळत्या भांडवलाची गरज भासते. मंदीच्या काळात, विक्रीचे प्रमाण कमी होते आणि म्हणूनच खेळत्या भांडवलाची आवश्यकता कमी होते.

**ज्ञानात भर**

**मंदी आणि तेजी:** हे आर्थिक चक्राचे टप्पे आहेत. मंदीमध्ये मागणी, बचत, उत्पादन आणि किमतीमध्ये घट होते. याचा अर्थ एकंदरीत आर्थिक क्रियाकलापांमध्ये घट असा होतो. तेजी म्हणजे व्यावसायिक क्रियाकलापांच्या वाढीचा काळ होय.

६) **खरेदी व विक्रीच्या अटी**

ज्या कंपनीला उधारीवर माल मिळत नाही; पण वस्तू विक्री करताना उधारीने द्याव्या लागतात अशा कंपनीला खेळते भांडवल जास्त लागते; मात्र, कंपनी स्वत: खरेदी करताना उधारीच्या सवलतीचा फायदा घेत असेल; पण वस्तूंची विक्री करताना अशी सवलत ग्राहकांना देत नसेल, तर त्या कंपनीस खेळते भांडवल कमी लागते.

७) **उधारीवरील अंकुश**

उधारीवर अंकुश ठेवताना उधार विक्रीचे प्रमाण, उधारीच्या अटी, वसुलीचे धोरण इत्यादीं गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. जर उधारीवर अंकुश ठेवण्याचे कंपनीचे धोरण कठोर असेल, तर कंपनीची आवक सुधारते. त्यामुळे, खेळते भांडवल कमी लागते. जर हे धोरण उदार असेल, तर वसुलीचा प्रश्न उद्भवतो. योग्य वेळेत वसुली झाली नाही तर बुडीत कर्जाची (bad debts) शक्यता असते. अशा कंपनीला खेळत्या भांडवलाची जास्त गरज भासते. रोखीचा व्यवहार करणाऱ्या कंपनीला खेळते भांडवल कमी लागते.

Sample Content

८) **प्रगतीचा व विकासाचा वेग**

कंपनीच्या उत्कर्षाबरोबर खेळत्या भांडवलाची गरजही वाढते. सातत्याने प्रगतीपथावर असणाऱ्या कंपनीस व्यवसायाच्या वाढत्या प्रमाणामुळे निधीची सतत आवश्यकता भासते.

९) **व्यवस्थापनाची कुवत**

जर उत्पादन व वितरण यांमध्ये योग्य समन्वय असेल, तर खेळत्या भांडवलाची आवश्यकता कमी असते. तसेच ज्या कंपनीस मालसाठा करून ठेवावा लागतो त्यांना खेळत्या भांडवलाची गरज जास्त असते.

१०) **बाह्य घटक**

वित्तीय संस्था तसेच बँका जर गरजेच्या वेळी निधी उपलब्ध करून देत असतील, तर खेळत्या भांडवलाची आवश्यकता जास्त नसते.

## झटपट उजळणी

| स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे घटक | खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे घटक |
|---|---|
| **व्यवसायावर आधारित** | **व्यवसायावर आधारित** |
| १) व्यवसायाचे स्वरूप | १) व्यवसायाचे स्वरूप |
| २) व्यवसायाचे आकारमान | २) व्यवसायाचे आकारमान |
| ३) व्यवसायाची व्याप्ती | ३) विक्रीचे प्रमाण |
| **स्थिर मालमत्तेवर आधारित** | ४) उत्पादन चक्र |
| ४) भाडेतत्त्वाचे प्रमाण | **उधारीच्या धोरणावर आधारित** |
| ५) उपकराराची व्यवस्था | ५) खरेदी व विक्रीच्या अटी |
| ६) जुन्या मालमत्तेचे संपादन | ६) उधारीवरील अंकुश |
| ७) सवलतीच्या दरात मालमत्ता संपादन | **उद्योगाची धोरणे व क्षमता यांवर आधारित** |
| **बाह्य घटकांवर आधारित** | ७) प्रगतीचा व विकासाचा वेग |
| ८) आंतरराष्ट्रीय स्थिती | ८) व्यवस्थापनाची कुवत |
| ९) अर्थव्यवस्थेचा कल | **बाह्य वातावरणावर आधारित** |
| १०) लोकसंख्येचा कल | ९) व्यापारी चक्र |
| ११) ग्राहक प्राधान्य | १०) बाह्य घटक |
| १२) स्पर्धात्मक घटक | |

**९. भांडवल संरचनेचा अर्थ स्पष्ट करा व त्याचे घटक सांगा. (फेब्रुवारी २०, मार्च १६, ऑक्टोबर १५)** T

**उत्तर:** १) भांडवल संरचना म्हणजे **इच्छित प्रमाणानुसार विविध स्रोतांचे निधी एकत्र करणे.** भांडवल संरचना ठरवणे म्हणजे, "एकूण भांडवलामध्ये वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर प्रमाण ठरवणे."

२) **विविध स्रोतांचा प्रमाणबद्ध एकत्रित रीतीने भांडवल संरचनेत समावेश केला जातो.** यालाच 'प्रतिभूतींचे मिश्रण' असे म्हणतात.

३) भांडवल संरचना ही **मालकीचा निधी व कर्जाऊ निधी यांपासून तयार होते.** मालकीच्या निधीमध्ये भाग भांडवल आणि राखीव व अतिरिक्त निधींचा समावेश होतो तर कर्जाऊ निधीमध्ये कर्जरोखे तसेच दीर्घमुदतीचे कर्ज यांचा समावेश असतो.

४) आर.एच.व्हेसल यानी भांडवल संरचनेची व्याख्या 'उद्योग व्यवसायात गुंतवलेले दीर्घमुदतीचे व वैविध्यपूर्ण निधी' अशी केली आहे.

५) जॉन हॅम्टन यांनी भांडवल संरचनेची व्याख्या, 'संस्थेची भांडवल संरचना म्हणजे कर्ज व समहक्क भाग या दोन प्रतिभूतींमधील संबंध, ज्यानुसार कंपनीला मालमत्ता खरेदीसाठी निधी पुरवठा केला जातो' अशी केली आहे.



Sample Content

**भांडवल संरचनेचे घटक**

भांडवल संरचनेचे चार घटक पुढीलप्रमाणे आहेत:

१) **समहक्क भाग भांडवल**

समहक्क भाग भांडवल हा कंपनीच्या भांडवलाचा प्राथमिक स्रोत आहे. समहक्क भागधारकांकडे कंपनीची मालकी असते. समहक्क भागाला अग्रहक्क समभागांना दिल्यानंतर लाभांश आणि परतावा मिळतो. मालकी हक्काबरोबर येणारी जोखीम ही त्यांनी स्वीकारलेली असते. समहक्क भागधारकांना दिला जाणारा लाभांश नफ्यावर अवलंबून असल्यामुळे अस्थिर असतो.

२) **अग्रहक्क भाग भांडवल**

या भागांना लाभांश वाटप व कंपनी विसर्जनाच्या वेळी भांडवल परतफेड यासाठी अग्रहक्क दिला जातो. यांना स्थिर दराने लाभांश दिला जातो.

३) **प्रतिधारण (संचयी) नफा**

हा निधी उभारणीचा अंतर्गत स्रोत आहे. याला नफ्याची पुनर्गुंतवणूक असे म्हणतात.

**ज्ञानात भर**

नफ्याची पुनर्गुंतवणूक (नफ्याचे भांडवलीकरण) म्हणजे वाटप न केलेल्या नफ्याची व्यवसायामध्ये गुंतवणूक करणे.

४) **कर्जाऊ भांडवल**

यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो:

i. **कर्जरोखे -** हा कंपनीने घेतलेल्या कर्जाचा पुरावा आहे. यावर निश्चित दराने व्याज दिले जाते.

ii. **मुदतीची कर्जे –** ही कर्जे बँक किंवा वित्तीय संस्थांनी दिलेली असतात. त्यावर निश्चित दराने व्याज दिले जाते.

पुढील दिलेल्या ताळेबंदावरून भांडवल संरचनेची संकल्पना समजून घेता येईल.

**३१ मार्च २०१९ रोजीचा अबक कंपनीचा ताळेबंद**

| देयता (देणी) | रक्कम ₹ | संपत्ती (मालमत्ता) | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| **भाग भांडवल** | | **स्थिर मालमत्ता** | |
| २०,००० समहक्क भाग | | इमारत | ५,००,००० |
| ₹ १० प्रत्येकी, पूर्ण किंमत दिलेले | २,००,००० | यंत्रसामग्री | २,००,००० |
| ५००० अग्रहक्क भाग | | **चालू मालमत्ता** | |
| ₹ १०० प्रत्येकी पूर्ण किंमत दिलेले | ५,००,००० | ऋणको | १,००,००० |
| **राखीव निधी व अतिरिक्त निधी** | ५०,००० | मालसाठा | ४०,००० |
| **दायित्वे** | | रोख रक्कम | २०,००० |
| १०००, १०% कर्जरोखे | | बँकेतील रक्कम | ४०,००० |
| ₹ १०० प्रत्येकी पूर्ण किंमत दिलेले | १,००,००० | | |
| धनको | ३०,००० | | |
| देय विपत्र | २०,००० | | |
| | **९,००,०००** | | **९,००,०००** |

भांडवल संरचना = समहक्क भाग + अग्रहक्क भाग + राखीव निधी + कर्जरोखे

= २,००,००० + ५,००,००० + ५०,००० + १,००,०००

= ८,५०,०००




Sample Content



**ज्ञानगुरू**

कर्ज आणि समहक्क भाग भांडवल यांमध्ये योग्य संतुलन असणे आवश्यक असते. जर कंपनी कर्जावर जास्त अवलंबून असेल, तर कर्जाची परतफेड न होण्याची जोखीम वाढू शकते. जर कंपनी समहक्क भाग भांडवलावर जास्त अवलंबून असेल, तर ती मूळ गुंतवणूकदारांचा परतावा कमी करेल.

**झटपट उजळणी**




**प्र. २** फरक स्पष्ट करा.

१. **स्थिर भांडवल आणि खेळते भांडवल. (T) (फेब्रुवारी २०, जुलै १७, मार्च १७, जुलै १६, मार्च १५, ऑक्टोबर १४)**

**उत्तर:**

| स्थिर भांडवल | खेळते भांडवल |
|---|---|
| **१) अर्थ** | |
| स्थिर भांडवल म्हणजे कोणत्याही प्रकारची स्थिर मालमत्ता किंवा संपत्ती होय. | खेळते भांडवल म्हणजे एकूण चालू मालमत्तेची बेरीज होय. |
| **२) स्वरूप** | |
| हे भांडवल व्यवसायात जवळ जवळ कायमस्वरूपी राहते. | खेळते भांडवल हे अभिसरण भांडवल आहे. ते बदलत राहते. |
| **३) कारण** | |
| हे भांडवल स्थिर संपत्तीमध्ये गुंतवले जाते. जसे, जमीन, इमारत, फर्निचर इत्यादी. | हे भांडवल अल्प मुदतीच्या मालमत्तेमध्ये गुंतवले जाते. जसे- रोकड, मालसाठा, उधारी इत्यादी. |
| **४) स्रोत** | |
| भाग, कर्जरोखे, दीर्घ मुदतीचे कर्ज, बंधपत्रे या मार्गांनी स्थिर भांडवलाची उभारणी करता येते. | अल्प मुदती कर्ज, ठेवी, व्यापारी कर्जे इत्यादी मार्गांनी खेळते भांडवल उभे केले जाते. |
| **५) गुंतवणूकदाराचे ध्येय** | |
| गुंतवणूकदार भविष्यामध्ये नफा कमावण्याच्या उद्देशाने स्थिर भांडवलात पैसे गुंतवतात. | गुंतवणूकदार त्वरित परतावा मिळवण्याच्या उद्देशाने यात पैसे गुंतवतात. |
| **६) जोखीम** | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक जोखमीची असते. | खेळत्या भांडवलातील गुंतवणूक कमी जोखमीची असते. |

Sample Content

## सराव चाचणी

**वेळ: १ तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१ अ. योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.** **[२]**

१. उत्पादन उद्योगाला स्थिर मालमत्ता मिळवण्यासाठी ______ प्रमाणावर निधी गुंतवावा लागतो.
   अ. मोठ्या ब. छोट्या
   क. कमीतकमी

२. ज्या कंपनीला ______ करून ठेवावा लागतो त्यांना खेळत्या भांडवलाची जास्त गरज असते.
   अ. जास्त मालसाठा ब. कमी मालसाठा
   क. शून्य मालसाठा

**ब. खालील विधानांसाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.** **[२]**

१. दीर्घ कालावधीसाठी वापरली जाणारी स्थिर मालमत्ता मिळवण्यासाठी या भांडवलाची आवश्यकता असते.
२. वित्त पुरवठा करणारा अंतर्गत स्त्रोत.

**क. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** **[२]**

१. संस्थात्मक वित्त व्यवस्थापन केवळ कंपनीच्या भांडवल संपादनाशी संबंधित असते.
२. उधारीवर विकलेल्या मालाच्या येणाऱ्या मूल्यासाठी लागणारे भांडवल खेळत्या भांडवलामध्ये येते.

**ड. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[३]**

१. संस्थात्मक वित्त व्यवस्था - व्याख्या लिहा.
२. खेळत्या भांडवलाची व्याख्या लिहा.
३. उत्पादन चक्र खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर कशाप्रकारे परिणाम करते?

**प्र.२ खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही १)** **[२]**

१. वित्त गुंतवणुकीचा निर्णय
२. भांडवल संरचना

**प्र.३ खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.** **[४]**

१. मुकेश ट्रेडर्स ही एक आवश्यक वस्तूंची व्यापारी संस्था आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात मालसाठा करावा लागतो आणि आपल्या ग्राहकांना पत सुविधा द्यावी लागते.
   i. त्यांना खेळते भांडवल कमी लागेल, की जास्त?
   ii. त्यांना जास्त स्थिर भांडवल लागेल का?
   iii. जर ते चैनीच्या उत्पादनांचा व्यापार करत असतील, तर त्यांना खेळते भांडवल तुलनेने जास्त लागेल, की कमी?

**प्र.४ खालील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही १)** **[२]**

१. संशोधन आणि विकासाला सतत आर्थिक मदत लागते.
२. खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर विविध घटक परिणाम करतात.

**प्र.५ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणताही १)** **[८]**

१. स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे घटक लिहा.
२. भांडवल संरचनेचा अर्थ स्पष्ट करा व त्याचे घटक सांगा.

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

Sample Content

# AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

## SCIENCE

### Perfect Series:
For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

### Precise Series:
For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### Additional Books for Std. XII Sci. & Com.:

- A collection of Board Questions (PCMB)
- A collection of Board Questions with solutions (PCMB)
- 20 Model Question Papers with solutions (PCMB & E)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

## COMMERCE (ENG. & MAR. MED.)

### Smart Notes:

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

## ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

### Languages:

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section
Junior College | Degree College
Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Visit Our Website

Address: 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15 • Website: www.targetpublications.org • Email: mail@targetpublications.org